# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ ऑक्टोबर २०२४


## महिला महाविद्यालयात 'स्वच्छता ही सेवा है' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता ही सेवा है उपक्रमांतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर यादरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात दिनांक २८ सप्टेंबर रोजी "स्वच्छता ही सेवा है" या विषयावर महाविद्यालयाच्या रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व उपस्थित सर्वांना स्वच्छतेची शपथ ही देण्यात आली.

३० सप्टेंबर रोजी महाविद्यालय परिसराची स्वच्छता तसेच स्वच्छता ही सेवा है, स्वच्छ भारत निरोगी भारत या आणि अशा विविध घोषवाक्यांनी रॅली काढण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी परिसरातील लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती केली.

१ ऑक्टोबर रोजी ऐतिहासिक पर्यटन स्थळ पानचक्की, प्रसिद्ध सिद्धार्थ उद्यानाजवळील परिसर स्वच्छता यांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व ग्रीन क्लब सदस्य स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरासोबतच ऐतिहासिक पर्यटन स्थळ पानचक्की परिसरातील तसेच प्रसिद्ध सिद्धार्थ उद्यानाजवळील परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करून परिसर कचरामुक्त केला. स्वयंसेवकांनी तेथील परिसर स्वच्छ करून कचरा निर्मूलन करून स्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

या स्वच्छता मोहिमे अंतर्गत स्वयंसेवकांनी ४५० किलो कचरा गोळा केला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी पानचक्की पर्यटन परिसरात तसेच सिद्धार्थ उद्यानाजवळील परिसरात आलेल्या पर्यटकांनाही स्वच्छतेविषयी माहिती देऊन जनजागृती केली. यासाठी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य प्रो. डॉ. सुनिता बाजपाई, ग्रीन क्लब समन्वयक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. मीनल श्रीगिरीवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अजित पवार यांचा फोटो फडणवीस यांच्या पोस्टरवरुन गायब — अंबादास दानवे



**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यात लाडकी बहिणी योजनेची चांगलीच चर्चा सुरू आहे. एकिकडे सत्ताधारी पक्ष यामुळे आपल्या विजयाचा दावा करत आहेत. तर दुसरीकडे विरोधी पक्ष या योजनेवर टीका करत आहेत. त्यातच आता या योजनेत श्रेयवादाची लढाई सुरू झाली असल्याचे दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बॅनरवरुन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा फोटो गायब आहे. त्यानंतर यावरुन आता विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी टीका केली आहे.

या संदर्भातील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्यावर निशाणा साधला. सहकारी पक्षांची गरज संपली की त्यांचे फोटो बॅनर वरुन गायब होतात, असे म्हणत अंबादास दानवे यांनी टीका केली आहे. वास्तविक देवेंद्र फडणवीस यांचे भारतीय जनता पक्षाच्या वतीने लावण्यात आलेल्या बॅनरवर अजित पवार यांचा फोटो गायब असल्याचे दिसून येत आहे. यावरून त्यांनी भाजपवर टीका केली आहे. इतकंच नाही तर या योजनेतील मुख्यमंत्री हा शब्द देखील गायब केला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या संदर्भात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून राज्य सरकारवर निशाणा साधला. निवडणूक संपली की 'तुम कौन हम कोन' असे भाजपचे धोरण असल्याची टीका देखील त्यांनी केली. या संदर्भातील राज्य सरकार तसेच भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर दानवे यांनी निशाणा साधला आहे. आपल्या पोस्टमध्ये दानवे यांनी म्हटले की, 'सहकारी पक्षांची गरज संपत आली की असे बॅनरवरून उपमुख्यमंत्री अजित पवार गायब होतात.

लाडकी बहीण योजनेच्या नावातील 'मुख्यमंत्री' हा शब्द गायब केला आहे. ताटातील चटणी सारखा मुख्यमंत्री शिंदेचा फोटो तेवढा शिल्लक आहे! निवडणूक संपली की त्यांनाही 'तुम कौन.. हम कौन' असंच दिसतंय! ' यामध्ये सिल्लीखाना चौक, शिंदे गटाचे तब्बल पाच आमदार असलेले छत्रपती संभाजीनगर असा उल्लेख देखील त्यांनी केला आहे.






## नाना पटोले यांना मी मोजत नाही - अशोक चव्हाण



**नांदेड** : काँग्रेसने अशोक चव्हाण समर्थक अर्धापूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगरा-ध्यक्षांसह नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. काँग्रेसच्या या कारवाईवर संतप्त झालेल्या अशोक चव्हाण यांनी मंगळवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर टीकेची झोड उठवली. मी नाना पटोले यांना मोजत नाही, तर काँग्रेसचे येथील जिल्हाध्यक्ष बी आर कदम हे गद्दार आहेत, असे ते म्हणालेत.

अशोक चव्हाण यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती. त्यानंतर त्यांनी भाजपत प्रवेश केला होता. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपला नांदेड लोकसभा मतदारसंघाची जागा निवडून येईल असे वाटत होते. पण तिथे काँग्रेस उमेदवार वसंत चव्हाण यांचा विजय झाला. यामुळे अशोक चव्हाण भाजपमध्ये बॅकफूटवर फेकल्या गेले. आता काँग्रेसने नांदेड येथील अशोक समर्थक नेत्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

**अशोक चव्हाण समर्थकांना पक्षाबाहेरचा रस्ता**

काँग्रेस जिल्हाध्यक्ष बी आर कदम यांनी अर्धापूर नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांसह १० नगरसेवकांना पक्षाबाहेरचा रस्ता दाखवला आहे. हे सर्वजण अशोक चव्हाण समर्थक होते. काँग्रेसच्या या कारवाईविषयी पत्रकारांनी मंगळवारी अशोक चव्हाण यांना छेडले असता त्यांनी या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला. मी नाना पटोले यांना मोजत नाही. तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी आर कदम हे गद्दार आहेत, असे ते म्हणाले.

**पटोलेंनी बी आर कदमांना दिले होते कारवाईचे सर्वाधिकार**

उल्लेखनीय बाब म्हणजे अर्धापूर नगरपंचायत ही अशोक चव्हाण यांच्या भोकर विधानसभा मतदारसंघात येते. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांना त्याचा मोठा लाभ झाला असता. काँग्रेसने ही बाब ओळखून या नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांवर कारवाईची कुऱ्हाड चालवली आहे. लोकसभा निवडणुकीत या सर्वांनी काँग्रेसविरोधात भाजपचा प्रचार केल्याचा अहवाल जिल्हाध्यक्ष बी आर कदम यांनी पक्षश्रेष्ठींकडे पाठवला होता. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बी आर कदम यांनाच या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे सर्वाधिकार दिले होते. त्यानुसार, कदम यांनी ही कारवाई केली.

**चव्हाण यांचा लोकसभेचे अपयश पुसून टाकण्याचा होता प्रयत्न**

नांदेड लोकसभा मतदारसंघात भाजपचा पराभव झाल्यामुळे अशोक चव्हाण यांना जबर झटका बसला. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत अपयश आल्यामुळे अशोक चव्हाण यांचे केंद्रातील मंत्रिपद हुकले अशी चर्चा नांदेडच्या राजकीय वर्तुळात सुरू होती. त्यामुळे अशोक चव्हाण लोकसभेचे अपयश विधानसभा निवडणुकीत पुसून टाकण्याच्या प्रयत्नांत होते. पण काँग्रेसने त्यांच्या काँग्रेसमधील समर्थकांची हकालपट्टी करत त्यांना जोरदार धक्का दिला आहे.

## सिडकोच्या कोंढाणे धरणात महायुतीने १४०० कोटींचा घोटाळा - वडेट्टीवार यांचा आरोप

**मुंबई** : महायुतीची घोटाळ्यांची मालिका अखंड सुरूच आहे. महायुतीने सिडकोच्या पाणी पुरवठा योजनेत कोंढाणे धरण प्रकल्पात 1400 कोटींचा महाघोटाळा केला आहे. सध्या महायुती मेघा इंजिनिअरिंगवर मेहेरबान आहे. त्यामुळे या कंपनीचा खिसा भरण्यासाठी हा घोटाळा केला असल्याचा हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारने या सिडकोच्या पाणीपुरवठा योजनेतील कोंढाणे धरण प्रकल्पातील 1400 कोटींच्या घोटाळ्याची चौकशी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी यावेळी केली. त्याचबरोबर आमचं सरकार आल्यावर महायुतीच्या काळातील घोटाळ्यांची आम्ही चौकशी करू असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुंबई येथील प्रचितगड या शासकीय निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते. सरकार मेघा इंजिनिअरिंगवर कंत्राटांची खैरात करत आहे. सरकारला लाडक्या कंत्राटदारांचे खिसे भरून निवडणूक फंड गोळा करण्यात व्यस्त असल्याने शेतकऱ्याकडे पहायला सरकारला वेळ नाही. म्हणून सोयाबिन उत्पादक शेतकरी सोयाबिनला दर मिळण्यासाठी मंत्रालयासमोर टाहो फोडत आहे. अदानीला खूश करण्यासाठी पाम तेल आयत केल्याने सोयाबिनचे दर पडले आहेत. सरकारसाठी अदानी, मेघा इंजिनिअरिंग लाडके कंत्राटदार आहेत. पण हे सरकार शेतकऱ्याला लाडका कधी म्हणणार असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, नवी मुंबईतील सिडको तर्फे पाणी पुरवठा करण्यासाठी कोंढाणे धरण हस्तांतरीत करण्यात आले. यासाठी सिडकोने 1400 कोटींचे टेंडर काढले. यापूर्वी या धरणाबाबत मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल झाली होती. अंजली दमानिया यांनी याचिका ही दाखल केली होती. यावेळी मूळ कंत्राटदार काम करण्यास तयार असेल तर त्याला काम करण्यास सांगितले होते. झालेल्या 35 टक्के कामासाठी मूळ कंत्राटदाराला 100 कोटी रुपये देण्यात आले. मात्र अचानक सिडको साक्षात्कार झाला आणि इथे माती ऐवजी सिमेंट काँक्रीटचे धरण झाले पाहिजे अशी सरकारने भूमिका घेतली. पुन्हा 3 सप्टेंबर 2023 रोजी टेंडर काढले. यामध्ये 700 कोटींचे काम वाढवून 1400 कोटी वर नेण्यात आले. पण मुळात प्रश्न असा आहे की, आरसीसी काम करण्याचा निर्णय का घेतला गेला. मेघा इंजिनियरिंग या कंपनीला समोर ठेवूनच हा निर्णय घेण्यात आला आहे हे स्पष्ट आहे. मोरबे धरणातून 20 वर्ष झाली दररोज नवी मुंबईला पाणी पुरवठा होतो. मग हे धरण आरसीसी करण्याचे कारण काय? लाडक्या कंत्राटदार साठी कोंडाणे धरणाचे स्वरूप का बदलले. याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे.

वडेट्टीवार म्हणाले की, याच मेघा इंजिनिअरिंगचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कौतुक करतात. ठाणे बोरिवली भुयारी मार्गाचे काम देखील दिले या कंपनीला दिले आहे. यासाठी नुकत्याच झालेल्या कॅबिनेटमध्ये 18 हजार 838 कोटींच्या खर्चाला मान्यता दिली आहे. 14 हजार कोटींवरून 18 हजार कोटी रूपये या प्रकल्पाची किंमत कशी झाली हा देखील प्रश्न आहे. सिंचन, वाहतूक, वीज अशा अनेक क्षेत्रात कंपनीने आपले हातपाय पसरले आहेत. या कंपनीला नागपूरला कामे दिली आहे. पुणे रिंग रोड, बस निर्मितीसारखी कामे या कंपनीला दिले. इलेक्टोरल बाँड सर्वाधिक खरेदी करणारी ही कंपनी असल्याने सरकारने हे लाड पुरविले आहे. पुणे रिंग रोड, नागपूर महानगर पालिका, समृद्धी, ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा, ईव्ही बस निर्मिती अशी सगळी कामे या कंपनीला देऊन कंपनीवर खैरात केली आहे.

महायुती सरकार घोटाळे करताना थकत नाही. महाराष्ट्र लूटून खाण्याचे काम सुरू आहे. या सरकारचे कितीही घोटाळे जनतेसमोर मांडले तरी देखील सरकारला काहीच फरक पडत नाही. कारण महायुती सरकार गेंड्याच्या कातडीचे सरकार आहे. या सरकारला हाकलल्याशिवाय महाराष्ट्राचे भलं होणार नाही अशा शब्दात महायुतीच्या भ्रष्ट कारभाराची वडेट्टीवार यांनी चिरफाड केली.